**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** बिटर गांव **Year (वर्ष):** 2023

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0277 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/07/2023 01:46 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 19/07/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/07/2023

**Time From (वेळेपासून):** 15:20 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:27 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 20/07/2023 **Time (वेळ):** 01:04 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/07/2023 01:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 08 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उमरखेड ते ढाणकी रोडवरील श्रीर,उमरखेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. प्रदीप दत्ता सुरोशे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोप्रा खुर्द,उमरखेड,बिटर गांव,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोप्रा खुर्द,उमरखेड,बिटर गांव,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिलकुमार शंकर वाघमारे | | | 1. कोप्रा खुर्द,उमरखेड,बिटर गांव, यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 10,000/ रूपये ज्यात 500/ रूपये दराच्या 20 चव आरोपीचा पॅन्टलनी नोटा | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 10,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

अँ.क.ब्युरो, यवतमाळदिनांकः-19/07/2023फिर्यादिमी प्रदीप दत्ता सुरोषे, वय 29 वर्ष, धंदा शेती, रा. कोप्रा खुर्द पोस्ट कृष्णापुर ता उमरखेड जिल्हा यवतमाळ नमुद पत्यावर माझे कुटंुबासह राहतो. श्री.सुनिलकुमार वाघमारे, सरपंच यांनी मला माझी आई श्रीमती. चंद्रकला सुरोषे हीचे नांवे मंजुर झालेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक सिंचन विहीरीचे कामगार लावून केलेल्या कामाच्या मजुरांच्या जबकार्डवर सही करणेकरीता 10,000/- रुपये लाचेची मागणी केल्याने, मी त्यांचेविरुध्द लाच मागणीची तक्रार दिनांक 17/07/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय यवतमाळ येथे येउन पोलीस निरीक्षक बिनायक कारेगावकर यांचे समक्ष लेखी तक्रार दिली, ती खालील प्रमाणे आहे.तक्रारप्रती,मा.पोलीस निरीक्षकलाचलुचपत प्रतीबंधक विभाग,यवतमाळ. अर्जदार:- श्री. प्रदीप दत्ता सुरोषे, वय 29 वर्ष, धंदा शेती, रा.कोप्रा खुर्द पोस्ट कृष्णापुर ता उमरखेड जिल्हा यवतमाळ मो.क्र. 7387608834 0000मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय यवतमाळ येथे हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहत असुन माझे षिक्षण 12 वी पर्यंत झाले असुन मला मराठी व हिंदी भाषा लिहीता, वाचता येते. माझी आई श्रीमती. चंद्रकला दत्ता सुरोषे हीचे नांवे ग्राम कोप्रा खुर्द येथ 1 हेक्टर 16 आर शेती असुन मी व आई शेती करून आमचे कुटुंबाचा उदरर्निवाह करतो. माझी आई ही अषिक्षीत असल्याने तीचे शेतीचे, शासकीय तसेच इतर व्यवहाराचे संपुर्ण कामकाज मीच करून देत असतो, माझे आईचे नांवे मी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक सिंचन विहीर शेतामध्ये मिळणे करीता दिनांक 08/02/2023 रोजी पंचायत समिती उमरखेड येथे अर्ज केला होता, त्यावरून आईचे शेतामध्ये विहीर मंजुर झाल्याने शासनाचे नियमानुसार ज्या व्यक्तींकडे जब कार्ड असतील त्यांचेकडुनच विहीर तयार करावी लागत असल्याने मी गावातील जबकार्ड धारक मजुर लावुन विहीर खोदण्याचे काम सुरू केले, परंतु विहीरीच्या मजुरीचे शासनाचे पैसे हे तात्काळ मिळत नसल्याने मला कामगारांना मजुरीचे स्वतः जवळील पैसे दयावे लागतात. त्यानंतर शासनाचे मजुरीचे पैसे जमा झाल्यावर ते मजुर त्यांचे बंक खात्यातुन पैसे काढुन आम्हाला परत करतात. मला आतापर्यंत अंदाजे 62,000/- रूपये मिळाले आहे. मला माझे गांवचे ग्रामरोजगार सेवक श्री. संदीप भोयर यांनी दिनांक 15/07/2023 रोजी मस्टरची प्रत तयार करून त्यावर सरपंच श्री सुनिलकुमार शंकरराव वाघमारे यांची सही आणने करीता दिले असता मी सरपंच वाघमारे यांना जाउन भेटलो व मस्टरवर सही मागीतली तेव्हा त्यांनी मला म्हटले की तु आतापर्यंत फुकटात विहीर बनवली माया काय फायदा करून नाही देता तेव्हा मी त्यांना म्हटले की सरकारन विहीर देली तेव्हा सरपंचानी मला म्हटले ते जाउ दे तु मले दहा हजार रूपये आणुन दे तेव्हा मी सही करतो नाही तर ते मस्टर वापस घेउन जा माझे जवळ पैसे नसल्याने व विहीरीचे काम थांबुन असल्याने मी नाईलाजाने हो म्हणुन तेथुन निघुन आलो. तरी सरपंच श्री.सुनिलकुमार वाघमारे हे मला माझी आई श्रीमती. चंद्रकला सुरोषे हीचे नांवे मंजुर झालेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक सिंचन विहीरीचे कामगार लावून केलेल्या कामाच्या मजुरांच्या जबकार्डवर सही करणेकरीता

10,000/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत. मला त्यांना लाचेची रक्कम दयावयाची नराल्याने मी त्यांचे विरुध्द आज रोजी लाच मागणीची तक्रार देत आहे. माझी व सरपंच श्री.वाघमारे यांचे मध्ये दुष्मनी नसुन देवाणघेवाणचा उसाणवारीचा कोणताही व्यवहार आमचे मध्ये नाही. तरी सरपंच श्री. वाघमारे यांनी मला लाचेची मागणी केल्यास व स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी ही विनंती. अषी तक्रार दिली. पो.नि.कारेगांवकर यांनी दिनांक 17/07/2023 रोजी माझे तक्रारीची पडताळणी करणेकरीता उपवनसंरक्षक, यवतमाळ वनविभाग यवतमाळ येथुन पंच क्र. 1)श्री.अरूण लालसिंग राठोड, षिपाई व 2)श्री.महम्मद शकील महम्मद अकील शेख, वनरक्षक असे दोन शासकीय पंच बोलावले. यानंतर पो.नि.कारेगांवकर यांनी दोन्ही पंचाना माझी व मला पंचाची ओळख करुन दिली. त्यांना मी सांगितलेली तोंडी व लेखी तक्रार वाचण्यास देण्यात आली. माझी तोंडी व लेखी तक्रारीतील मजकुर एकच असल्याची खात्री झाल्याने दोन्ही पंचानी व पो.नि.कारेगांवकर यांनी तक्रारीवर स्वाक्षरी केली. पो.नि.कारेगांवकर यांनी मला सांगितले की, सरपंच यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कामासंबधाने चर्चा करावी. यावेळी पडताळणी कार्यवाही दरम्यान होणारे संभाषण हे व्हईस रेकर्डरव्दारे सनडिस्क कंपनीचे 32 जी.बी.मेमरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगीतले. तसेच व्हईस रेकर्डरचे प्रात्यक्षीक सुध्दा करून दाखविण्यात आले, सविस्तर कार्यवाही मला व पंचाना समजावुन सांगीतली. सविस्तर कार्यवाही दिनांक 17/07/2023 रोजीचे पडताळणी पुर्व पंचनामा प्रमाणे करण्यात आली. माझे विनंतीवरुन तक्रारीची पडताळणी दिनांक 17/07/2023 रोजी करण्याचे ठरविल्यावरुन पो.नि.श्री. कारेगावकर, पंच, अधिकारी व स्टाफसह शासकीय वाहनाने हे ग्राम हरदडा महादेव मंदीर येथे आलो. यानंतर पो.नि. श्री.कारेगावकर यांनी व्हईस रेकर्डर सुरु करुन माझे गळयात शर्टचे आतमध्ये लटकविला, ती वेळ 19/23 वा ची होती. मला व पंच क्र.1) श्री.राठोड यांना माझेकडील दुचाकी वाहनाने सरंपच श्री.वाघमारे यांची भेट घेणेकरीता रवाना केले. पंच क्र.2) हे पडताळणी पथकाजवळ थांबुन होते. सरपंच वाघमारे हे घरी नसल्यामुळे त्यांची भेट नझाल्याने मी पंच पडताळणी पथकाजवळ परत आलो. पो. नि.श्री.कारेगावकर यांनी माझेजवळील व्हाईस रेकडर बंद केला, ती वेळ 19/55 वाजताची होती. विचारल्यावरूण संपुर्ण हकीकत मी पंचासमक्ष सांगितली. सविस्तर कार्यवाही दिनांक 17/07/2023 रोजी चे पडताळणी पंचनामा क्रमांक 1) प्रमाणे करण्यात आली. यानंतर दिनांक 19/07/2023 रोजी पो.नि.श्री.कारेगावकर, पंच, अधिकारी व स्टाफसह शासकीय वाहनाने हे उमरखेड ते ढाणकी रोडवरील ग्राम हरदडा महादेव मंदीर येथे आले व माझी भेट घेतली. पो.नि.श्री.कारेगावकर यांनी श्री.वाघमारे सरपंच यांची भेट घेणेकरीता मला, व पंच क्रमांक 1) श्री. राठोड यांना सुचना देऊन व्हईस रेकर्डर सुरु करुन माझे गळयात शर्टचे आतमध्ये लटकविला, ती वेळ 10/27 वा ची होती. मला व पंच क्रमांक 1) श्री.राठोड यांना श्री.वाघमारे सरपंच यांची भेट घेण्याकरीता ग्राम कोप्रा खुर्द येथे माझेकडील दुचाकी वाहनाने रवाना केले. पंच क्रमांक 2) श्री.शेख हे पथकाजवळ थांबुन होते. मी व पंच क्र.1 यांचेसह कोप्रा खुर्द येथे जात असतांना माझी कोप्रा ते कृष्णापुर रोडवरील शेतषिवारा जवळ श्री.वाघमारे सरपंच यांची भेट झाली. मी पंच क्र.1) श्री राठोड यांचे समक्ष श्री.वाघमारे सरपंच यांची भेट घेतली व त्यांचे सोबत कामासंबंधाने चर्चा केली. चर्चेदरम्यान श्री.वाघमारे सरंपच यांनी पंचासमक्ष मला व माझी आई श्रीमती. चंद्रकला सुरोषे हीचे नांवे मंजुर झालेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक सिंचन विहीरीचे कामगार ला्ुवन केलेल्या कामाच्या मजुरांच्या जबकार्डवर सही करणेकरीता 10,000/- रुपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. यानंतर मी, व पंच क्र.1) श्री.राठोड यांचेसह पडताळणी पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. पो.नि.कारेगावकर यांनी माझे जवळील व्हाईस रेकर्डर घेउन बंद केला, ती वेळ 10/54 वाजताची होती. यानंतर विचारल्यावरून मी व पंच क्र. 1 यांनी घडलेली सविस्तर हकीकत पंचासमक्ष सांगितली. यानंतर पो.नि.कारेगावकर यांचे सुचनेवरून पुढील लेखी कारवाई करण्यात आली, व्हईस रेकर्डर मधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत संभाषणाची ट्रान्सक्रिप्ट माझे मदतीने तयार करण्यात आले. सविस्तर करवाई दिनांक 19/07/2023 रोजीचे पडताळणी पंचनामा क्रमांक 2 प्रमाणे करण्यात आली. यानंतर दिनांक 19/07/2023 रोजी पो.नि.कारेगावकर यांनी सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या वाघमारे सरपंच यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यास डावा हात स्वतःचे डोक्यावरुन वांरवार फिरवावा असा ईषारा सागीतला. यानंतर पो.नि.कारेगावकर यांनी सिलबंद असलेले सनडिस्क कंपनीचे 32 जी.बी.मेमरी कार्ड काढले व व्हाईस रेकर्डर मध्ये माझे व पंचासमक्ष टाकले. वरून ग्राम हरदडा महादेव मंदीर येथे सापळापुर्व प्रमाणे कारवाई करण्यात आली, सविस्तर करवाई दिनांक 19/07/2023 रोजीचे सापळापुर्व पंचनामा प्रमाणे◌े करण्यात आली. यानंतर दिनांक 19/07/2023 रोजी मी वाघमारे सरपंच यांना फोन करून पैसे जाळ जोळ झाल्याचे सांगीतले असता त्यांनी मला ढाणकी येथील फुलसावंगी फाटा येथे पैसे घेउन बोलाविल्याने, पो.नि. कारेगावकर यांनी ढाणकी रोडवरील हरदडा फाटा येथुन व्हईस रेकर्डर सुरु करुन माझे गळयात शर्टचे आतमध्ये लेसव्दारे लटकवीला, ती वेळ 15/20 वाजताची होती. त्यांनतर पो.नि.कारेगावकर यांनी मला व पंच क्र. 1) राठोड यांना वाघमारे सरपंच यांची भेट घेणे करीता ढाणकी येथील फुलसावंगी फाटयाकडे रवाना केले. यानंतर पो.नि.कारेगावकर, पो.नि. वानखडे, पंच क्रमांक 2) श्री.शेख सापळा पथकातील सर्व कर्मचारी असे ढाणकी येथील फुलसावंगी फाटयाकडे रवाना झाले. यानंतर मी ढाणकी ते उमरखेड रोडवरील फुलसावंगी फाटया जवळील रविचंद्र गादीया यांचे लेआउट येथे श्री.वाघमारे सरपंच यांची भेट घेतली, तेव्हा पंच क्र. 1) राठोड हे जवळच उभे होते. मी वाघमारे सरपंच यांचे सोबत माझ्या कामासंबंधाने चर्चा केली, चर्चेदरम्यान मी वाघमारे सरपंच यांना पैष्याची जाळ जोळ झाले असल्याचे सांगीतले तेव्हा वाघमारे यांनी मला लाचेची मागणी केली असता मी माझे पन्टच्या खिष्यामध्ये ठेवलेली अन्थ्रासीन पावडर लागलेली लाचेची रक्कम 10,000/-रु माझे उजवे हाताने बाहेर काढुन वाघमारे सरपंच यांना दिली असता, वाघमारे सरपंच यांनी 10,000/-रू लाचेची रक्कम स्विकारून दोन्ही हाताने मोजली व त्यांचे पन्टचे मागील खिष्यामध्ये ठेवली स्विकारली, यानंतर मी माझा डावा हात डोक्यावर वारं वार फिरवला व पुर्वनियोजीत ईषारा सापळा पथकास केला. त्यावरून पो.नि.विनायक कारेगावकर, पो.नि. वानखडे व पथकातील कर्मचारी यं◌ानी तेथे लगेच येऊन वाघमारे सरपंच यांचे दोन्ही हात पकडुन त्यांना ताब्यात घेतले व माझेजवळील व्हईस रेकर्डर ताब्यात घेउन बंद केला, ती वेळ 15/27 वा होती. वाघमारे सरपंच यांचे हात, लाचेच्या नोटा व माझे हात अल्ट्राव्हईलेट दिव्यांचे प्रकाषात तपासण्यात आले. तसेच लाचेच्या नोटांचे क्रमांक तपासुन पाहण्यात आले. सविस्तर कार्यवाही दिनांक 19/07/2023 रोजीचे सापळा कार्यवाही पंचनामा प्रमाणे करण्यात आली. तरी इतर आरोपी लोकसेवक सुनिलकुमार शंकर वाघमारे, सरपंच यांनी दिनांक 19/07/2023 रोजी पडताळणी दरम्यान पंचासमक्ष मला माझी आई श्रीमती.चंद्रकला सुरोषे हीचे नांवे मंजुर झालेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक सिंचन विहीरीचे कामगार ला्ुवन केलेल्या कामाच्या मजुरांच्या जबकार्डवर सही करणेकरीता 10,000/-रु लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. व दिनांक 19/07/2023 रोजी 15/20 वा ते 15/27 वाजता सापळा कार्यवाही दरम्यान ई.आ.लो.से.सुनिलकुमार शंकर वाघमारे, सरपंच यांनी उमरखेड ते ढाणकी रोडवरील श्री.रविचंद्र गादीया यांचे लेआउट मधील मोकळ्या जागेत माझेकडुन पंचासमक्ष 10,000/- रूपये लाच रक्कम स्विकारली, त्यावेळी पो.नि.कारेगांवकर व स्टाफ यांनी त्यांना लाच रकमेसह रंगेहात पकडले. त्यावरुन .आलोसे सुनिलकुमार शंकर वाघमारे, वय 38 वर्ष, पद सरपंच, नेमणुक ग्राम पंचायत कोप्रा खुर्द पंचायत समिती उमरखेड ता उमरखेड जिल्हा यवतमाळ रा.ग्राम कोप्रा खुर्द पोस्ट कृष्णापुर ता उमरखेड जिल्हा यवतमाळ यांचेविरुध्द कायदेषीर कारवाईस्तव तक्रार देत आहे. माझी वरीलप्रमाणे तक्रार मराठीत टंकलीखीत केली असुन, मी अ.क.ब्युरो पथकासह पोलीस स्टे शन बिटरगांव येथे येऊन तक्रार देत आहे, सदर तक्रार मला वाचुन दाखविण्यात आली ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): SUJATA GULABRAO BANSOD(I (Inspector)) / 16401000362SGBF8501K **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

सुजाता बन्सोड(स.पो.नि.)
ठाणेदार
पो. स्टे. बिटरगांव

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** SUJATA GULABRAO BANSOD
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 16401000362SGBF8501K

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)